# मुंबई विद्यापीठ

**क्र. मासविक/आयसीडी/२०२१-२२/२८०**

## परिपत्रक

## ( Break the Chain )

संदर्भ : 1) Government of Maharashtra, Dept. of Revenue and forest, Disaster Management, Relief and Rehabitation, Management, Mantralaya, Mumbai- 400 032 Order No, DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 30th May, 2021

2) विद्यापीठ परिपत्रक क्र.मासविक/आयसीडी/२०२१-२२/१, दिनांक २२ एप्रिल, २०२१.

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात उद्भवलेल्या कोरोना (COVID-१९) विषाणूच्या पार्श्वभूमीवर उपरोक्त संदर्भीय क्र. २ येथील परिपत्रकान्वये दिनांक २२ एप्रिल, २०२१ पासून विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती विभागातील कर्मचारी संख्येच्या १५% किंवा ५ कर्मचारी यापैकी जी संख्या जास्त होईल त्याप्रमाणे राहील असे कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भीय क्र.१ येथील दिनांक ३० मे, २०२१ रोजीच्या शासन आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ व साथरोग कायदा, १८९७ कलम (२) अन्वये संपुर्ण राज्यामध्ये कलम १४४ अन्वये संचारबंदी तसेच कोवीड १९ विषाणूच्या संसर्गाची साखळी खंडीत करण्यासाठी (Break the chain) सुधारीत निर्बंध दिनांक १ जून, २०२१ ते १५ जून, २०२१ पर्यंत लागू करण्यात आले आहेत. त्यातील सूचनांनुसार विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिनांक १ जून, २०२१ ते १५ जून, २०२१ पर्यंत विभागातील कर्मचारी संख्येच्या २५% प्रमाणे राहील. सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागाचे दिनांक १५ जून, २०२१ पर्यंतचे उपस्थिती विवरणपत्र कुलसचिवांना सादर करावे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत कार्यालयीन आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांस कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य असेल.

सदर बाब सर्व संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**( डॉ. बळीराम गायकवाड )**
**प्रभारी कुलसचिव**

मुंबई – ४०० ०३२
दिनांक – ३१ मे, २०२१

Desktop/Laxman/Marathi Circular

**(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसंचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

२) स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र-कुलगुरु ३) कुलसचिव ४) वित्त व लेखा अधिकारी
५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) सचिव, उमासा.

२) सचिव, मुंबई विद्यापीठ ऑफिसर्स वेल्फेअर असोशिएशन

३) सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ

४) सरचिटणीस, एज्युकेशनल एम्प्लॉईज वेल्फेअर असोशिएशन